# संत साहित्यातील विद्रोह

**डॉ. मारोती बालासाहेब भोसले**
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख,
स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्‌यालय,पूर्णा. जि.परभणी-४३१५११.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये संतांच्या कार्याचे तसेचसंत साहित्याचे योगदान मोलाचे आहे. तेराव्या शतकात महाराष्ट्रावर देवगिरीच्या रामदेवराय यादव राजाची सत्ता होती. हेमाद्री पंडित हा यादव राजाचा प्रधान होता. हेमाद्री पंडित धर्ममार्तंड होता. प्रधानाच्या मार्गदर्शनाखाली राज्य चालत होते. सर्वसामान्य समाज व्रतवैकल्ये, देवपूजा, मंत्र-तंत्रांच्या विळख्यात अडकला होता. राजाला समाज कल्याणाचा जणू विसर पडला होता.राज्यव्यवस्थेकडूनच समाजातील विषमतेस खतपाणी घातले जात होते. त्यामुळे बहुजन समाजाचे जगणे भयावह बनले होते.बहुजनांना संस्कृत भाषा शिकण्याचा अधिकार नव्हता.संस्कृत भाषा केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी होती. त्यामुळे संस्कृत साहित्यात सर्वसामान्यमाणसांच्या जीवनाचे प्रतिबिंब उमटलेच नव्हते.

विद्रोह म्हणजे जुलमी व्यवस्थेच्या विरोधात उठाव करणे. प्रस्थापितांच्या विरोधात लिहिणे. विद्रोह विवेकातून आलेला असावा. विद्रोह समाजाच्या कल्याणासाठी असावा. समाजासाठी क्लेशकारक ठरणाऱ्या व्यवस्थेविरोधात लिहिणे हे योग्य आहे. आपण प्रस्थापित होणे म्हणजे दांभिकपणा आहे.महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामीयांनीमहाराष्ट्रातीलसर्वसामान्य जनतेचे विस्कळीत झालेले जीवन अभ्यासले.त्यांनी लोकांना जाणीवपूर्वक मराठी भाषेतून तत्त्वज्ञान सांगितले. आपल्या शिष्यांना लोकभाषेतून अर्थात तत्कालीन मराठीभाषेतून साहित्य लेखन करण्याससांगीतले.त्याकाळी त्यांनी केलेले हे कार्य विद्रोही होते.

पूर्वी स्त्रियांवर अनेक बंधनं होती. मीराबाईंनी स्त्रियांवर असणारे बंधनं झुगारूनस्त्रीमुक्तीची मुहूर्तमेढ रोवली एक दिवस मीराबाई हातात एकतारी घेऊनघराबाहेर पडल्या. अठरापगड जातीच्या संतांबरोबर बेभान होऊन नाचल्या.त्यांनी कोणाचीच पर्वा केली नाही. रविदास सारख्या चांभार समाजातील व्यक्तीला गुरू केले. त्याकाळी एका स्त्रीने केलेली हे धाडस म्हणजे मोठा विद्रोह होता.त्याकाळीसमाजब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चारवर्णामध्ये विभागला होता. समाजात खूप कर्मकांड वाढले होते. मंदिरात केवळ उच्च वर्णीयांना प्रवेश दिला जात होता. त्यामध्ये संत ही भरडल्या गेले. संतानी आपल्या अभंगामधून भावना व्यक्त केल्या. त्यामध्ये संत मीराबाई, महात्मा बसवेश्वर, श्रीचक्रधर स्वामी, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत तुकाराम इत्यादी होत. यासंतानी आपल्या अभंगामधून विद्रोही विचार मांडले आहेत.

**महात्मा बसवेश्वर:**

महात्मा बसवेश्वर यांचा जन्मइ.स.११३१ यावर्षी कर्नाटक राज्यात विजापूर जिल्ह्यातील बागेवाडीया गावी झाला.त्यांचे वडील मादिराज हे शैव ब्राह्मण होते. आईचे नाव मादलांबिका होते.

वडील ब्राह्मण असल्यामुळे घरात कुळाचार, कर्मकाण्ड, संस्कार अतिशय कडक होते. महात्मा बसवेश्वर हे क्रांतिकारी युगपुरुष होते. त्याकाळी स्त्रियांनी मुंज करण्याची प्रथा नव्हती. महात्मा बसवेश्वरांची मोठी बहीण नागलांबिकाची मुंज झालेली नव्हती. म्हणून बसवेश्वरांनीबालवयात मौंजबंधनास नकार दिला. बसवेश्वरांना स्त्री-पुरुष भेद मान्य नव्हता. त्यांनीआई-वडीलांना विरोध करून घराचा त्याग केला. त्यांनी कृष्णा-मलप्रभा या कुडलसंगम क्षेत्री विद्या व्यासंगासाठी बारावर्षे उपासना केली.कुडलसंगम हे त्याकाळी उच्च विद्येचे एक नामांकित केंद्र होते.

बलदेव हे बसवेश्वर यांचे मामा चालुक्य राजाचा मांडलिक राजा बिज्जल याच्या पदरी मंगळवेढा येथे दंडाधिकारी होते. बसवेश्वर ज्ञानी आणि स्वतंत्र विचारसरणीचे होते. मामांच्या मदतीने बसवेश्वर बिज्जल राज्याच्या पदरी सामान्य प्रशासनाच्या सेवाचाकरीत दाखल झाले. मामांनी त्यांची मुलगी गंगाम्बिका हिचाविवाह बसवेश्वरांबरोबर लावून दिला. तो बसवेश्वरांचा पहिला विवाह होता.सिद्धरस यांची कन्या निलाम्बिका हिच्याशी त्यांचा दुसरा विवाह झाला. सिद्धरस हे क्षत्रिय होते. तर बसवेश्वर हे ब्राह्मण होते. त्यांचा दुसरा विवाह हा आंतरजातीय विवाह होता त्याकाळी हा विद्रोह होता.

बसवेश्वरांनी आप्तस्वकीयांची पुरोहितशाहीतील विसंगती उघडी करून त्यांनाही आत्मपरीक्षण करण्यास भाग पडले. ब्राह्मण हा जन्माने मोठा नसतो.तो त्याच्या कार्यकर्तृत्वाने, ज्ञानार्जनाने, आचार विचाराने श्रेष्ठ ठरू शकतो.त्यासाठी ज्ञान आणि शुद्ध विचार यांना महत्त्व दिले पाहिजे. विश्वातील प्रत्येक व्यक्ती आत्मोद्धार करून घेण्यास पात्र आहे.त्यामुळेजन्म आणि जातीचा बागुलबुवा करू नयेहे सज्जन माणसाचेलक्षण आहे. हा विचार स्पष्ट करताना महात्मा बसवेश्वर म्हणतात,

“दासीपुत्रनागली वेश्यापुत्रनागली
शिवदीक्षेयाद बळीक
साक्षात् शिवनेंदु वंदिसीपुजिसि..... |”

दासीपुत्र असो,अथवा वारांगनेचा पुत्र असो,जर तो ईश्वरभक्तीमुळे उजळला असेल,विशुद्ध आचार करीत असेल तर तो वंदनीय मानायला हवा. त्याचे पद आणि प्रसादही पावन असतो. महात्मा बसवेश्वर यांनी ईश्वरत्त्व मानले. पण त्यांना मूर्तीपूजा मान्य नाही. देव हृदयी असावा असे त्यांना वाटत असे. देवमंदिरापेक्षा देहमंदिर महत्त्वाचे ठरवून ते विशुद्ध ठेवण्याचा आग्रह त्यांनी धरला.

महात्मा बसवेश्वर यांनी रूढी, परंपरा व कर्मकांडाच्या विरोधात बंड पुकारले. पशुहत्येचा कडाडून विरोध केला. इसवी सन ११४२ मध्ये त्यांनी धर्म व समाज सुधारण्यासाठी कर्नाटक मध्ये ‘अनुभव मंटपाची’ स्थापना केली. अल्लम प्रभू या मागासवर्गीय व्यक्तीची अनुभव मंटपाच्याअध्यक्षस्थानी नेमणूक केली. त्यामध्ये मादर चेन्नय्या (मांग), शिवनागमय्या (महार), कक्कया (ढोर), समगार हरळय्या (चांभार), शंकर दासीमय्या (शिंपी) अशासर्व जाती-धर्मांच्या स्त्री-पुरूषांना त्यांनी अनुभव मंटपात मुक्त प्रवेश दिला त्यामुळे सर्व जाती धर्माचे लोक मांडीला मांडी लावून बसू लागले.समता, बंधुता आणि श्रमप्रतिष्ठा ही बसवेश्वरांच्या क्रांतिकार्याची मुख्य त्रिसूत्री होती. स्त्री-पुरूष, उच्च-नीच, जात-जमात असा कोणताही भेदभाव त्यांच्या ‘अनुभव मंटपात’नव्हता.कल्याण येथील हरळय्या हे जातीने चांभार होते. मधुवरस हे ब्राह्मण होते. मधुवरस यांनी आपली कन्या

कलावती हिचा विवाह हरळय्या याचा मुलगा शिलवंत याच्याशी लावून देण्याचे ठरवले. अनुभव मंटपामध्ये या विवाहाविषयी साधकबाधक चर्चा झाली. महात्मा बसवेश्वर आणि अल्लम प्रभू यांच्या आशीर्वादानेकुठल्याही परिणामांची पर्वा न करता हा आंतरजातीय विवाह लावून देण्यात आला. त्याकाळी ही खूप मोठी विद्रोही घटना होती.

**संत जनाबाई :**

संत जनाबाई यांचा जन्म परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथे तत्कालीन शूद्र समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये झाला. आई-वडिलांचे छत्र बालपणीच हरवले.कोवळ्या वयात पोरकी झालेली अनाथ पोर पंढरपूर येथे संत नामदेवांच्या घरी राहू लागलीत्यांच्या घरचे सडा-सारवण, दळण-कांडण, धुणी-भांडी सर्व प्रकारची कामे करू लागली. संत नामदेवांच्या सहवासात राहिल्यामुळे तिला विठ्ठलभक्तीची आवड निर्माण झाली.तत्कालीन समाजाने स्त्रियांवर,शूद्रांवर अनेक बंधने लादली होती. संत जनाबाई नामदेव यांच्या घरी राहत असल्यामुळे त्यांच्यावर गैरवर्तनाचे, अनैतिकतेचे आरोप करण्यात आले. अनेक बऱ्या-वाईट प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. अनेकदा मानहानी, मन:स्ताप सहन करावा लागला. विठ्ठलाचे पदक चोरीचा त्यांच्यावर आळ घेण्यात आला.

स्त्रीने केवळ चूल आणि मूल सांभाळावे.तिने घराबाहेर पडू नये. बाहेर पडल्यास डोक्यावर पदर घ्यावा. मान खाली घालून चालावे.बाजारात जाऊ नये. अशी तत्कालीन समाजाने लादलेली सर्व बंधने संत जनाबाईंनी झुगारून दिली. त्याविरुद्ध विद्रोह केला. स्त्री स्वातंत्र्यासाठी पहिले पाऊल उचलले. संत नामदेवांच्या सहवासात राहून त्या अभंग रचना करू लागल्या.त्या लिहितात,

“ डोईचा पदर आला खांद्यावरी | भरल्या बाजारी जाईन मी || १ ||
हाती घेईन टाळ खांद्यावरी विणा | आता मज मना कोण करी || २ ||
पंढरीच्या पेठे मांडीयले पाल | मनगटावर तेल घाला तुम्ही || ३ ||
जनी म्हणे देवा झाले येसवा | निघाले केशवा घर तुझे || ४ || ”

ईश्वर भक्ती ही काही पुरुषांचीच मक्तेदारी नाही. स्त्रियांना देखील ईश्वर भक्ती करण्याचा अधिकार आहे.हे त्यांनी दाखवून दिले. अशाप्रकारे संत जनाबाईंनी आपल्या अभंगांमधून तत्कालीन समाजाने लादलेली बंधने झुगारून दिली. खांद्यावरवीणा घेऊन त्या घराबाहेरपडल्या आणि निंदकांना त्यांनी ठणकावून सांगितले.मला काय नावे ठेवायची ते ठेवा. एवढेच नाही तर मनगटावर तेल घालून बोंब मारा. मी विठ्ठल भक्ती करणारच. असे विद्रोही विचार त्यांनी अभंगांमधून लिहिले आहेत.

**संत ज्ञानेश्वर:**

संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी संन्यासदीक्षा घेतल्यानंतर परत गृहस्थाश्रम स्वीकारला त्यानंतर संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचा जन्म झाला. त्यामुळे तत्कालीन ब्राह्मण समाजाने त्यांना ‘संन्याशाची पोरं’म्हणून हिणविले आणि समाजातून बहिष्कृत केले परत समाजात घेण्यासाठी त्यांच्या आई-वडिलांना देहांत प्रायश्चित घेण्यास भाग पाडले. तरीही ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांना समाजात घेण्यासाठीपैठणच्या धर्मगुरूंकडून शुद्धिपत्रक आणण्यास सांगितले.पैठण येथे धर्मगुरूंसोबत

झालेल्या चर्चेच्या वेळी संत ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद बोलविले.अर्थात वेदांचा अभ्यास केवळ विद्वान, पंडित यांनाच माहित आहे. हा त्यांचा भ्रम दूर केला.

संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेत बंदिस्त करून ठेवलेले तत्वज्ञान मराठी भाषेत लिहून सर्वसामान्यांसाठी खुले केले.स्वार्थाने बरबटलेल्या तत्कालीन समाज व्यवस्थेला चपराक बसविली.'माझा मराठाचि बोलु कौतिके| परी अमृतातेही पैजा जिंके| ऐसी अक्षरे रसिके मेळविण ||' मराठी भाषा संस्कृतभाषेपेक्षा कमी नाही. ती अमृतापेक्षा ही श्रेष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले. अशाप्रकारे सकारात्मक, नवनिर्मितीक्षम आणि परिवर्तनशील अशा प्रकारचे विद्रोही विचार संत ज्ञानेश्वरांनी आपल्या साहित्यातून आविष्कृत केले आहेत.त्याकाळी हाखूप मोठा विद्रोह होता.

**संत चोखामेळा:**

संत चोखामेळा यांचा जन्म अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये झाला. उच्चवर्णीयांनी लादलेल्या रूढी,प्रथा, परंपरा आणि जाचक बंधनांमुळे त्यांना जागोजागी अपमान सहन करावा लागला. अशावेळी संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वरांनी अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून वारकरी संप्रदायात आणले. त्यामध्ये सर्व जाती धर्माचे स्त्री-पुरुष सर्वांना समान वागणूक दिली. त्यांनीएकप्रकारे आध्यात्मिक लोकशाही स्थापन केली. त्यामध्ये संत चोखामेळा यांनादेखील सामावून घेतले.संत नामदेवांकडून प्रेरणा घेऊन ते विठ्ठल भक्ती करू लागले. तसेच त्यांनी जगलेले, भोगलेले जीवन, त्यांच्या व्यथा, वेदना अभंगांमधून रेखाटू लागले. ते लिहितात,

" ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा | काय भुललासी वरलिया रंगा ||
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा| काय भुललासी वरलिया रंगा ||
नदी डोंगी परी जळ नोव्हे डोंगा |काय भुललासीवरलिया रंगा ||
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा | काय भुललासी वरलिया रंगा || "

संत चोखामेळा म्हणतात ऊस कितीही वाकडा असला तरी त्यातील रस गोड असतो. तसे चोखामेळा कितीही हीन जातीत जन्मला तरी त्याचा भाव मात्र शुद्ध आहे. अशाप्रकारे तत्कालीन सामाजिक दांभिकतेवर आपल्या खास विद्रोही शैलीत त्यांनी अभंग लिहिले आहेत.

"पंढरीचे ब्राह्मणे चोख्याशी छळिले |तयालागी केले नवल देवे||
सकळ समुदाय चोखियाचे घरी |ऋद्धी सिद्धी द्वारी तिष्ठताती|| "

चोखामेळा तत्कालीन शूद्र समजल्या जाणाऱ्या महार जातीत जन्मले. त्यांनी अशाप्रकारे आपल्या अभंगातून अतिशय निर्भीडपणे आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.त्याकाळीसंत चोखामेळा सारख्या एका मागासवर्गीय व्यक्तीने निर्भीडपणे आपल्या अभंग रचनेतून भावना व्यक्त करणे हा विद्रोह होता.

**संत तुकाराम:**

संत तुकाराम यांचा जन्म देहू या ठिकाणी वारकरी कुटुंबात झाला त्यांचे घराणे विठ्ठलोपासक होते. संसाराचा डाव रंगात आला असता आस्मानी संकटांची मालिका कोसळली. सुखी संसाराची होरपळ झाली.जीवनाची क्षणभंगुरता आणि नश्वरता त्यांच्या प्रत्ययाला आली. या निराशेतून बाहेर पडण्यासाठी भक्तीशिवाय दुसरा मार्ग नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मनन,चिंतन सुरू केले. आध्यात्माच्या

वाटेवरचा हा प्रवास सुरू असताना महान तपस्येनंतर एक दिवस ते संत ठरले. आयुष्यात घेतलेल्या चांगल्या आणि वाईट अनुभवांनी त्यांचे अंतःकरण काठोकाठ भरले. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी धरिताही परी आवरेना'अशी त्यांची अवस्था झाली.ती त्यांनी शब्दबद्ध केली. ते लिहितात,

" आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ||
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन | शब्द वाटू धन जन लोका || "

संत तुकारामांनी संवेदनशील आणि निर्मळ मनाने लिहिलेले अभंग थेट मनाला भिडू लागले. संत तुकाराम सर्वसामान्यांना आपले प्रतिनिधी वाटू लागले. मनस्वी भक्ती हीच महान शक्ती आहे. देव दगडात नसून माणसात आहे. पूजाअर्चा केवळ खटाटोप आहे. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले | तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा ||' हे त्यांनी सांगितले.

अशाप्रकारे जवळपास पाच हजार अभंग त्यांनी लिहिले. ते कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करू लागले. हे तत्कालीन कर्मठ,सनातनी प्रवृत्तींना निश्चितच आवडणारे नव्हते.शूद्रांनी तत्वज्ञान सांगणे हा त्या काळी गुन्हा होता. त्यामुळे रामेश्वर भटाने त्यांचा खूप छळ केला. त्यांनी लिहिलेल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदीत बुडविल्या. सालोमालो सारख्या शूद्राने त्यांना सतावले. मंबाजीने देह दंडाचे स्मरण करून दिले. त्यांचे अभंग जनसामान्यांना मुखोद्गत असल्यामुळे त्या अभंगांचे पुनर्लेखन केले. त्यामुळे अभंग बुडाले नाहीत. ते आज 'तुकाराम गाथा' या ग्रंथामध्ये संग्रहित आहेत.

संत तुकारामांचे आध्यात्मातील वाढणारे महत्व स्वतःला विद्वान, ज्ञानी, पंडित, वैदिक म्हणून घेणारांना ते आवडणारे नव्हते. म्हणून ते संत तुकारामांचा सतत अपमान करू लागले. त्यांच्या तथाकथित पांडित्याला आव्हान देत, संत तुकाराम सडेतोड भाषेत लिहितात,'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा| येरांनी वाहावा भार माथा ||' वेदांचा खरा अर्थ आम्हाला माहित आहे आणि तो जाणून घेण्याचा अधिकार सर्व जाती धर्माच्या लोकांना आहे. याविषयी ते लिहितात,

" सकळ शास्त्रांचे सार हे वेदांचे गव्हर |पाहता विचार हाचि करिती पुराणे ||
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चांडाळ अधिकार |बाळे नारी नर आदि करोनि वेश्याही || "

अशाप्रकारे संत तुकारामांनी उच्च नीच, स्त्री-पुरुष या सर्वांना वेदांचा अर्थ जाणून घेण्याचा अधिकार आहे हे ठणकावूनसांगितले.

संत तुकारामांची ईश्वरावर नितांत श्रद्धा होती. तरीही ईश्वराविषयीच्या संकल्पना अतिशय डोळसपणे त्यांनी स्वीकारल्या आहेत. अंधश्रद्धा, भोंदूगिरी, ढोंगीपणा, बुवाबाजी, दैववाद याला त्यांनी नाकारले. त्याविषयी ते लिहितात 'नवसेसायासे कन्या पुत्र होती | मग का करणे लागे पती ||'प्रस्तुत अभंगाच्या माध्यमातून त्यांनी विज्ञानवादी विचार आविष्कृत केले आहेत.माणसाचे अंतःकरण शुद्ध नसेल, तर तो दिवस - रात्र जरी गंगेत बसून राहिला. तरी त्याने केलेले पाप धुतल्या जाणार नाही. त्याविषयी मनाची शुद्धता महत्त्वाची आहे. त्याप्रमाणे एखाद्या माणसाचा जन्म ब्राह्मण कुळात झाला. परंतु त्याचे विचार आणि आचार शुद्ध नसतील. तर त्याने स्वतःला ब्राह्मण म्हणून घेऊ नये. त्याविषयी अतिशय परखड भाषेत संत तुकाराम लिहितात,

"अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड |
कोण त्याची रांड प्रसवली || "

अशा प्रकारे संत तुकारामांनी आपल्या अभंगांमधून तत्कालीन धर्ममार्तंडांना मोठे हादरे देणारे, परखड भाषेत विद्रोही विचार लिहिले आहेत.

आमुचिया भावे तुज देवपण | ते का विसरोन राहिलासी ||
जेणे तुज आले रूप आणि नाव | पतित हे देवा तुझे पायी ||
नाही तरी देवा तुज कोणहो पुसतो | निरंकारी पेटे एकाएकी ||
तुका म्हणे आम्ही असोनिया या जाण | तुज देवपण घडविले आम्ही || "

जगद्गुरु संत तुकाराम म्हणतात, देवा तुला देवपण माणसामुळे आले आहे हे तू विसरू नकोस. तुला रूप आणि नाव माणसाने दिले.देवाचा निर्माता माणूस आहे. माणसाने ईश्वर निर्माण केला आहे. जे पतित, पिडीत, दु:खी आहेत. ते तुझ्या चरणी लागतात. नाहीतर तुला कोणीही पुसले नसते. संत तुकाराम अतिशय निर्भयपणे परखड भाषेत आपले विचार अभंगातून मांडतात. त्यांचे विचार विद्रोही आहेत.

**निष्कर्ष :**

१) 'विद्रोह' म्हणजे जुलमी व्यवस्थेच्या विरोधात उठाव करणे. प्रस्थापितांच्या विरोधात लिहिणे. विद्रोह विवेकातून आलेला असावा. विद्रोह समाजाच्या कल्याणासाठी असावा. समाजासाठी क्लेशकारक ठरणाऱ्या व्यवस्थेविरोधात लिहिणे म्हणजे विद्रोह होय.

२) १३ व्या शतकातसर्वसामान्य समाज व्रतवैकल्ये, देवपूजा, मंत्र-तंत्रांच्या विळख्यात अडकला होता. राजा विषमतेस खतपाणी घालत होता.संस्कृत भाषा केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी होती. बहुजनांना संस्कृत शिकण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन संस्कृत साहित्यात उमटलेच नव्हते.

३)महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांनीमहाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे विस्कळीत झालेले जीवन अभ्यासले.त्यांनी लोकांना जाणीवपूर्वक मराठी भाषेतून तत्त्वज्ञान सांगितले. आपल्या शिष्यांकडून लोकभाषेतून अर्थात तत्कालीन मराठीतून साहित्य लेखन करून घेतले त्याकाळीहे धाडसीआणि विद्रोहीकार्य होते.

४) मीराबाईंनी स्त्रियांवर असणारे बंधनं झुगारून स्त्रीमुक्तीची मुहूर्तमेढ रोवली एक दिवस मीराबाई हातात एकतारी घेऊनघराबाहेर पडल्या. अठरापगड जातीच्या संतांबरोबर बेभान होऊन नाचल्या. त्यांनी कोणाचीच पर्वा केली नाही. रविदास सारख्या चांभार समाजातील व्यक्तीला गुरू केले. त्याकाळी एका स्त्रीने केलेली हे धाडस म्हणजे मोठा विद्रोह होता.

५) संस्कृत भाषेत बंदिस्त करून ठेवलेले तत्वज्ञान संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत लिहून सर्वसामान्यांसाठी तत्त्वज्ञान खुले केले. संत ज्ञानेश्वरांनी सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी पसायदान मागून मराठी भाषेची महती सांगितली आहे. हे विद्रोही कार्य होते.

६) बसवेश्वरांनी बालवयात मौंजबंधनास नकार दिला. बसवेश्वरांना स्त्री- पुरुष भेद मान्य नव्हता. त्यांनी आई-वडीलांना विरोध करून घराचा त्याग केला.बसवेश्वरांनीसिद्धरस यांची कन्या निलाम्बिका हिच्याशी आंतरजातीय विवाह झाला.बसवेश्वरांनी रूढी, परंपरा व कर्मकांडाचे विरोधात बंड पुकारले. अल्लम प्रभू यांची अनुभव मंटपाच्या अध्यक्षस्थानी नेमणूक केली अल्लम प्रभू हे मागासवर्गीय होते. त्याकाळी हा विद्रोह होता.

७) मधुवरस यांनी आपली कन्या कलावती हिचा विवाह हरळय्या याचा मुलगा शिलवंत याच्याशी लावून देण्याचे ठरवले. महात्मा बसवेश्वर आणि अल्लम प्रभू यांच्या आशीर्वादाने आणि सक्षम हा विवाह झाला. कुठल्याही परिणामांची पर्वा न करता हा आंतरजातीय विवाह लावून देण्यात आला. त्याकाळी ही खूप मोठी विद्रोही घटना होती.

८) संत जनाबाईंनी तत्कालीन समाजाने लादलेली सर्व बंधने झुगारून दिली. त्या खांद्यावरवीणा घेऊन घराबाहेरपडल्या आणि निंदकांना ठणकावून सांगितलेमला काय नावे ठेवायची ते ठेवा. एवढेच नाही तर मनगटावर तेल घालून बोंब मारा. मी विठ्ठल भक्ती करणारच. त्यांनी विद्रोह केला.

९) संत चोखामेळा हीन जातीत जन्माले. तरी त्यांचा भाव मात्र शुद्ध आहे. तो वरवरचा किंवा दिखाऊ नाही. अशाप्रकारे तत्कालीन सामाजिक दांभिकतेवर आपल्या खास विद्रोही शैलीत त्यांनी अभंग लिहिले.

१०) जगद्गुरु संत तुकाराम म्हणतातदेवाचानिर्माता माणूस आहे माणसाने ईश्वर निर्माण केला. त्यांनी ईश्वराविषयीच्या संकल्पना अतिशय डोळसपणे स्वीकारल्या आहेत. त्यांनी अंधश्रद्धा, भोंदूगिरी, ढोंगीपणा, बुवाबाजी, दैववाद नाकारून विज्ञानवाद स्वीकारला.संत तुकारामांनी आपल्या अभंगांमधून तत्कालीन धर्ममार्तंडांना मोठे हादरे देणारे, परखड भाषेत विद्रोही विचार लिहिले आहेत.

**संदर्भग्रंथसूची :**

| | | |
|---|---|---|
| १)दातार आरती | - महाराष्ट्रातील संतकवी | - डायमंड पब्लिकेशन, पुणे. |
| २) ईर्लेकर सुवासिनी | - संत जनाबाई | - मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. |
| ३) गोसावी रा. गो. | - श्री सकलसंतगाथा | - सारथी प्रकाशन, पुणे. |
| ४) साळुंखे आ. ह. | - विद्रोही तुकाराम | - लोकायत प्रकाशन,सातारा. |
| ५) रेवडे इंदुमती | - संत कवयित्री | - पॉपुलर प्रकाशन, मुंबई. |
| ६ ) यादव भा. क्र. | - मराठी संत कवयित्री | - स्नेवर्धन प्रकाशन, पुणे. |
| ७ ) सावंत माथु (संपा.) | - साहित्यसरिता | - अथर्व पब्लिकेशन, धुळे. |

***********